# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक २१-०४-१९८९ ते ३१-०५-१९८९**

**रजिष्टर क्र. ०४**

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**शुक्रवार दिनांक २१ एप्रिल,१९८९ रोजी दुपारी ३.०० वाजता नगरभुवन येथे मा.सभापती श्री.रतनकुमार पंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेस सुरुवात झाली.या सभेमध्ये पुढील स.सभासद उपस्थित होते.**

१) श्री.अलफखान हुसेनखान
२) श्री.इकबालसिंग प्रीतमसिंग गील
३) // गाढे गंगाधर सुखदेव
४) // मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
५) // यादव अशोक सायन्ना
६) // अजितकुमार शेळके
७) // मोरेश्वर दिनानाथ सावे
८) // मोतीराम नारायणराव घडामोडे
९) // कचरु चंद्रभान नवपुते
१०) // स.अ. एकबालोद्दीन स.मो.कुतूबोद्दीन
११) // स.हुसेन स.अहमद

**विषय.क्र. ११०८ :**

विद्यमान १२ स्थायी समिती सदस्यांपैकी ६ सदस्य निवृत्त करणे.

**संवाद :**

**मा.सभापती :** स्थायी समितीच्या विद्यमान बारा सदस्यांपैकी सहा सदस्यांचे निवृत्तीबाबत तयार केलेले नियम खालीलप्रमाणे असतील.

१) मतदान पेटीत १२ सदस्यांच्या नावाने १२ चिठ्ठया टाकण्यात येतील.
२) एकूण १२ सदस्यांपैकी सहा सदस्य निवृत्त होत असल्याने सर्व मान्य व्यक्तींच्या हस्ते फक्त सहा चिठ्ठया मतदान पेटीच्या बाहेर काढल्या जातील.
३) बाहेर काढलेल्या सहा चिठ्ठयांवर ज्या स.सदस्यांची नावे असतील ते सहा सदस्य निवृत्त झाल्याचे घोषीत करण्यात येईल.
४) मतदान पेटीतील उर्वरित सहा चिठ्ठयांतील स.सदस्य आगामी वर्षाकरिता कार्यरत असतील.

**मा.श्री.मोरेश्वर सावे :** विद्यमान स्थायी समितीच्या बारा सदस्यांपैकी सहा सदस्यांची निवृत्ती करण्याबाबत जी पध्दत जाहीर केली त्याबद्दल आक्षेप आहे.तो खालीलप्रमाणे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये कलम २० पोटकलम (३) नुसार निम्म्या स्थायी समिती सदस्यांच्या निवृत्ती संदर्भात आज स्थायी समितीची बैठक बोलावण्यात आलेली आहे.

निम्म्या सदस्यांच्या निवृत्तीची योग्य ती पध्दत हयाच कलमाच्या पोटकलम (४) मध्ये नमूद केलेली आहे.ती खालीलप्रमाणे.

१) निवृत्त होणाऱ्या सदस्याने कायदयाच्या कलम २० पोटकलम (२) प्रमाणे त्यांच्या निवडणूकीचा एक वर्षाच्या कालावधी पूर्ण केलेला असावा.खालील स्थायी समिती सदस्य-

१) श्री.अजित शेळके
२) श्री.सय्यद रफत हुसेन
३) श्री.इकबाल मुजहिद
४) श्री.मोरेश्वर सावे
५) श्री.मोतीराम घडामोडे
६) श्री.कचरु नवपुते,

वरील सदस्य कलम २०,पोटकलम (२) अन्वये १८ ऑगस्ट १९८८ ला निवडून आलेले आहेत.हे सभासद निवड केलेल्या निवृत्त संचामध्ये समाविष्ट होवू शकत नाहीत कारण कलम २० पोटकलम (२) प्रमाणे वरील सदस्यांनी त्यांचा एक वर्षाचा कार्यकाल पूर्ण केलेला नाही.

यास्तव कलम २० पोटकलम (२) अंतर्गत निवृत्ती पध्दत फक्त त्याच सदस्यांना लागू होईल.ज्यांना स्थायी समिती सदस्यपदी निवडून आल्यापासून एक वर्षाचा कार्यकाल पूर्ण केला आहे.

वरील आक्षेपास स.सभासद श्री.मोतीराम घडामोडे व श्री.कचरु नवपुते यांनी अनुमोदन दिले.

**मा.श्री.यादव,अशोक सायन्ना :** या प्रकरणी न्यायालयाने यापूर्वीच निर्णय दिलेला आहे.त्याप्रमाणे सर्वांचा कार्यकाल एकच राहील.

**मा.श्री.अलफखाँ हुसेन खाँ :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० अन्वये स्थायी समितीचा कालावधी एक वर्ष पूर्ण असे म्हटले आहे.महापौर,उपमहापौर व स्थायी समितीचे सदस्य निवडीचे वेळी सभासदांनी अर्ज दाखल केले होते.पण त्यावेळी काही सदस्यांनी या निवडीवर बहिष्कार टाकला होता.त्यामूळे सहा स्थायी समिती सदस्य निवडले गेले व त्यानंतर उरलेले सहा सदस्य निवडले गेले.या निर्णयावर जिल्हा न्यायालय,उच्च न्यायालय,सर्वोच्च न्यायालयापर्यंत प्रकरण गेले आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार झालेली निवड योग्य आहे असा निकाल लागला आहे.तेव्हा स्थायी समिती योग्य रितीने निवडून आली आहे.आक्षेप फेटळून लावण्यात येतात.

**मा.सभापती :** मा.सचिवांनी नियमाप्रमाणे कार्यवाही करावी,अशी सूचना करतो.

**मा.श्री.गंगाधर गाढे :** मा.सचिवांनी ज्या सूचना केल्या त्याबाबत कायदयाचा हवाला द्यावा.

**विधी सल्लागार :** मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम २० पोटकलम १,२,३,४,मध्ये स्थायी समिती सभासद निवड पध्दती दिली आहे.पोटकलम ४ प्रमाणे मा.सभापतींना सहा सभासद कसे निवृत्त करावयाचे याचा अधिकार दिला आहे.त्याप्रमाणे त्यांनी आदेश दिला.

मा.आयुक्तांनी उक्त कलमांचा सविस्तर खुलासा केला.

**मा.श्री.मोरेश्वर सावे :** मा.आयुक्त व विधी सल्लागार यांचा गैरसमज झाला आहे असे दिसते.सहा सभासदांच्या निवडीबाबत न्यायालयात प्रकरण आहे.त्याबाबत आम्हाला काहीही म्हणावयाचे नाही.आम्ही फक्त पहिले सहा व त्यानंतर निवडून

आलेल्या सहा सभासदांची नावे या मतपेटीत टाकता येणार नाहीत असा आक्षेप घेतला आहे.यावर आपणास जो निर्णय घ्यावयाचा तो घ्यावा.

**मा.श्री.मोरेश्वर सावे :** स्थायी समितीच्या सदस्यांचे निवृत्तीबाबत अवलंबिण्यात येणाऱ्या चिठ्ठी पध्दतीसाठी रिव्हाल्वींग ड्रम वापरण्यात येतो.तशी व्यवस्था या ठिकाणी करण्यात यावी म्हणजे कोणावरही अन्याय होणार नाही.अन्यथा या प्रकरणी सभागृहातील बॉक्स वापरण्यात येणार असल्यास त्यास आमचा आक्षेप राहील.

**मा.श्री.अलफखाँ हुसेनखाँ :** महापौर,उपमहापौर व स्थायी समिती सदस्य निवडीच्या वेळी हाच बॉक्स (मतदान पेटी ) चा वापर करण्यात आला होता.त्यावेळी कोणताही आक्षेप घेतला गेला नाही.तेव्हा स.सभासदांचा वरील आक्षेप योग्य वाटत नाही.

समिती अध्यक्ष यांनी हाही आक्षेप फेटळून लावला.

यानंतर अंदाजे पाच-सहा वर्ष वयाच्या अजय त्रिंबक जाधव या मुलाच्या हस्ते मतदान पेटीतील क्रमवारीने एक-एक चिठ्ठी काढण्यात आली. काढण्यात आलेल्या सहा चिठ्ठयातील स.सभासदांची नावे खालीलप्रमाणे-

१) श्री.स.अ.एकबालुद्दीन स.मो.कुतूबुद्दीन.
२) --//-- रतनकुमार पंडागळे
३) --//-- गंगाधर गाढे
४) --//-- कचरु नवपुते
५) --//-- अजितकुमार शेळके
६) --//-- स.हुसेन स.अहमद.

यानंतर मा.सभापती यांनी अनु.क्र.१ ते ६ चे सभासद निवृत्त झाल्याचे घोषीत केले.त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापतींनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | सभापती |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | स्थायी समिती |
| | महानगरपालिका,औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २८-४-१९८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.दिनांक २८-४-८९ रोजी दुपारी ३.०० वाजता स्थायी समिती सभेस "नगरभुवन" (टाऊन हॉल) येथे मा.सभापती श्री.रतनकुमार पंडगळे यांच्या अध्यक्षतेखाली सुरुवात झाली.या सभेमध्ये सन्माननीय सभासद आणि कार्यालयीन अधिकारी उपस्थित होते.**

१) श्री.अलफखान हुसेनखान
२) // इकबालसिंग प्रीतमसिंग गील
३) // गाढे गंगाधर सुखदेव
४) // मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
५) // अजितकुमार शेळके
६) // मोरेश्वर दिनानाथ सावे
७) // मोतीराम नारायणराव घडामोडे
८) // कचरु चंद्रभान नवपुते
९) // स.मो.एकबालोद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
१०)// स.हुसेन स.अहमद.

**विषय क्र. ११०९ :**

दिनांक २० एप्रिल, १९८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**स.स.श्री. गंगाधर गाढे :** शहरातील एस.टी.स्टँड,सिध्दार्थ गार्डन,रेल्वे यार्डातील बाहेरील बाजू,क्रांतीचौक इत्यादी ठिकाणी रात्रीचे वेळी लहान लहान स्टाल लावून विक्री करण्यात येते.अशा व्यावसायिकांकडून महानगरपालिकेतर्फे कर वसूल करण्यात येतो काय?

**स.स.श्री.अलफखॉन हुसेनखॉन:** महापालिका प्राधिकरणातर्फे नियमाप्रमाणे अशा विक्रेत्यांना लायसन्स बॅच देण्यात येतात.

**स.स.श्री.गंगाधर गाढे :** मागील सभेमध्ये वाहन क्र. एमएचबी ३८०३ च्या बिलाबाबत शहर अभियंता यांनी अहवाल द्यावा असे ठरले होते.तेव्हा तत्संबंधीत अहवालाबाबत काय कार्यवाही झाली.

**मा.शहर अभियंता :** वाहन क्र. एमएचबी ३८०३ संबंधीच्या संचिका संकलित करुन घेण्यात आल्या आहेत आणि त्यांची तपास कार्यवाही चालू आहे.

**स.स.श्री.कचरु नवपुते :** मागील सभेमध्ये माझ्या वार्डातील दोन प्रस्तावांचा समावेश पुढील सभेच्या विषय पत्रिकेत करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते परंतु आजच्या सभेत त्यांचा समावेश नाही.

**मा.सभापती :** संबंधीत विभागाकडून आवश्यक ती कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्यावर कार्यवाही करण्यात येईल.

**स.स.श्री.गंगाधर गाढे :** सुराणा कॉम्प्लेक्सच्या बांधकामाबाबत मागील चर्चेच्या अनुषंगाने कार्यालयाने काय कार्यवाही केली याचा खुलासा करण्यात यावा.

**सहा.संचालक नगररचना :** मा.आयुक्त यांनी सुराणा कॉम्प्लेक्सची प्रत्यक्ष पहाणी केली या पाहणीच्या वेळी प्रत्यक्ष झालेले बांधकामाबाबतचा नकाशा दाखल करण्याबाबत संबंधितास सुचना देण्यात आल्या आहेत.संबंधितांकडून प्रत्यक्ष बांधकामाचा नकाशा दाखल झाल्यानंतर त्या नकाशाचा अभ्यास करुन काय कार्यवाही करता येणे शक्य आहे हे पाहण्यात येईल.

**स.स.श्री.गंगाधर गाढे :** उक्त सुचना संबंधितास लेखी स्वरुपात कळवून वेळेचे बंधन घालण्यात यावे.

**सहा.संचालक नगररचना :** स.सभसदाची सूचना मा.आयुक्त यांना कळविण्यात येईल.

**स.स.श्री. स.अ.एकबालोद्दीन :** मछली खडक येथील वसंत भुवन शेजारील बांधकामाबाबतचे खिंवसरा यांची संचिका सभागृहात मागविण्यात यावी.तसेच त्या बांधकामाबाबत खुलासा करण्यात यावा.

**विधी सल्लागार :** दि.२६/४/८९ रोजी कार्तिकी जवळील बांधकामाबाबत बांधकामाचा पंचनामा करण्यात आला आहे आणि सदरचे प्रकरणी न्यायालयात आवश्यक ती वैधानिक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**ठराव :**

दिनांक २० एप्रिल,१९८९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१११० :** किराडपुरा पंप हाऊस येथे ५ स्टेज व ४० मीटर हेड व ४००० गॅलन प्रति तास डिसचार्ज देणारे दोन पानबुडे विकत घेण्यासाठी निविदापत्रके मागविली असता एकूण तीन निविदापत्रके वसूल झालीत.

१) मे.अंबिका एजन्सीज,औरंगाबाद "एस.यु." या कंपनीचे पंपाची किंमत रु. १३,२२५/- प्रत्येकी दिली आहे.
२) मे.पगारीया इन्टरप्राईजेस औरंगाबाद "क्रॉम्प्टन" या कंपनीचे पंपाची किंमत रु. १५,९२५/- प्रत्येकी दिली आहे.
३) मे.संदिप सेल्स कॉर्पोरेशन औरंगाबाद "बजाज"या कंपनीचे पंपाची किंमत रु. १३,७१९/- प्रत्येकी दिली आहे.

वरीलपैकी सर्वात कमी दराचे दरपत्रक मे.अंबिका एजन्सीज,औरंगाबाद यांचे असून एकूण दोन पंपाची खरेदी करण्यासाठी रु. २६,४५०/-खर्च येणार आहे,तरी मे.अंबिका एजन्सीज,औरंगाबाद यांचेकडून दोन पंप खरेदी करण्याची मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किराडपूरा पंप हाऊस येथे ५ स्टेज व ४० मीटर हेड व ४००० गॅलन प्रति तास डिसचार्ज देणारे दोन पाणबुडे विकत घेण्यासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे मे.अंबिका एजन्सीज औरंगाबाद यांचे रक्कम रुपये १३,२२५/- प्रत्येकीच्या

दरपत्रकास तसेच दोन पाणबुडे खरेदीसाठी येणाऱ्या र.रु.२६,४५०/- च्या खर्चासा सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

"वार्ड क्र.१९ मध्ये मी नेहमी सांगूनसुध्दा पाणी पुरवठा व्यवस्थित केला जात नाही.सोबत येऊन प्रत्यक्ष पाहणी करतात व आज काम करतो असे खोटे सांगून अधिकारी दिशाभूल करतात.मा.आयुक्त साहेबांनी स्वतः लक्ष देवून संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या तरीसुध्दा आपले अधिकारी काम करीत नाही. आपण जोपर्यंत अधिकाऱ्यांना ताकीद देत नाहीत तोपर्यंत माझा बहिष्कार राहील.याबाबत मला योग्य खुलासा द्यावा.

वरीलप्रमाणे स.सभासद श्री.मिर्झा अन्वर बेग यांचे पत्रक मा.सभापती यांनी वाचून दाखविले आणि कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी जातीने लक्ष घालून काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

स.स.श्री.स.अ.एकबालोद्दीन : वार्ड क्र. १९ चे स.सभासद कार्यालयीन अधिकाऱ्यांसह गेल्या आठ दिवसांपासून या प्रकरणी वार्डाची पाहणी करीत आहेत.या पाहणीमध्ये जलवाहिनीचे व्हॉल्व्ह कमीजास्त प्रमाणात ॲडजेस्ट केल्यामूळे वार्ड क्र.१८ मधील पाणी पुरवठा कमी झालेला आहे.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. १११९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,वार्ड क्र. ४६ समर्थनगर येथे बजरंग व्यायाम शाळेजवळ रिटेनिंग वॉल बांधणे व रस्ता रुंदीकरण करणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु. १,३४,५३०/- चे सन १९८९-९० च्या सा.बां. खात्याच्या डि.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.४६ समर्थनगर येथे बजरंग व्यायाम शाळेजवळ रिटेनिंग वॉल बांधणे व रस्ता रुंदीकरण करणे बाबतच्या कामासाठी शहर अभियंता यांनी सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे र.रु.१,३४,५३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १११२ :** वार्ड क्र.२९ मो.पुर्णानंद भांडार ते जनता बाजार पर्यंत २५० मी.मी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अ-१ अंदाजपत्रक रक्कम रु.३१,३०१/- चे तयार करण्यात आले आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.२९ मो.पुर्णानंद भांडार ते जनता बाजार पर्यंत २५० मीमी.व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी रक्कम रु.३१,३०१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१११३ :**

वार्ड क्र.१७ मीर जंग मसजीद येथे ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणे बाबत ए-१ अंदाजपत्रक रक्कम रुपये २३,७८८/- चे तयार करण्यात आले आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र १७ मीर जंग मसजीद येथे ३०० मीमी व्यासाची आर.सी.सी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता रक्कम रुपये २३,७८८/-अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.१११४ :**

वार्ड क्र १७ मो.मीर जंग मसजीद लोटाकारंजा येथे १५० मीमी व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत ए-१ अंदाजपत्रक र.रुपये १२,५६३/- चे तयार करण्यात आले आहे.करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १७ मो.मीर जंग मसजीद लोटाकारंजा येथे १५० मीमी व्यासाची चीनी मातीची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता र.रु.१२,५६३/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. १११५ :** वार्ड क्र. ५८ येथील नाथनगर ते बौध्द नगर या रस्त्यावर हयूम पाईप कल्व्हर्ट आणि खडी रस्त्याचे काम करण्यासाठी इ.स.८८-८९ च्या डी.एस.आर.प्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु. ९४,०००/-चे तयार करण्यात आले असून मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ५८ येथील नाथनगर ते बौध्द नगर या रस्त्यावर हयूम पाईप कल्हर्ट आणि खडी रस्त्याचे कामासाठी रक्कम रु. ९४,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच काम तातडीच्या स्वरुपाचे असल्यामुळे श्री.सुखबीरसिंग,गुत्तेदार यांच्या मार्फत "अंदाजपत्रकीय " दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १११६ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की,कर आकारणी विभागाच्या इमारतीची सिलींग व व्हरांडयाचे बांधकाम करण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रु.८२,१००/- चे सन १९८९-९० च्या सा.बां.खात्याच्या डी.एस.आर.दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.सदरील खर्च इमारत दुरुस्ती या सदराखाली करण्यात येईल.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**स.स.श्री.मोरेश्वर सावे :** कर आकारणी विभागाची इमारत जुनी असून या इमारतीला सिलींग करण्याऐवजी आवश्यकतेनुसार कुलर आणि सिलींग फॅन बसविण्यात यावेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कर आकारणी विभागाकरीता सिलींग न करता त्याऐवजी आवश्यकतेनुसार कुलर व सिलींग फॅन बसविण्याची व्यवस्था करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**स.स.श्री.मोरेश्वर सावे :** वार्ड क्र.४३ अजबनगर येथील रस्त्याचे कामाचे संचिकेवर विकास योजनेतील ८० फुट रस्त्याचे कामास प्रधान्य दिल्यानंतर इतर रस्त्यांचे कामासंबंधी विचार करण्यात येईल असा मा.आयुक्त यांनी शेरा मारला आहे.अशा प्रकारचे धोरण ठेवणे शक्यतो योग्य होणार नाही.

**स.स.श्री.मोतीराम घडामोडे :** महानगरपालिकेच्या सभांसाठी प्रत्येकी चार ते पाच हजार रुपयांचा खर्च होतो अशी बातमी स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्द झाली आहे हे खरे आहे काय? आणि असेल तर त्यावर विचार करणे आवश्यक आहे.

**मा.सचिव :** महापालिका सभांना साधारणतः २६० ते २७० व्यक्तींना प्रत्येकी रुपये १४/- दराने नाश्ता दिला जातो.यामध्ये सन्माननीय सभासद,कार्यालयीन अधिकारी,कर्मचारी,पोलीस,पत्रकार यांचा समावेश आहे.

**स.स.श्री.गंगाधर गाढे,स.स.श्री.कचरु नवपुते :** वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीबाबत सचिवांनी केलेला खुलासा योग्य वाटत नाही तेव्हा या प्रकरणी चौकशी करण्यात यावी.

**मा.सभापती :** महापालिका सभेकरीता नाश्त्यासाठी होणाऱ्या खर्चावर नियंत्रण आणण्याकरीता यापुढे स.सभासद,कार्यालयीन अधिकारी,पत्रकार इ.चा मिळून निश्चित किती व्यक्तींना नाश्ता द्यावयाचा हे ठरवून घेणे आवश्यक आहे.

**लेखाधिकारी :** वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीमध्ये मनपाकडून माहिती मिळाली असा खुलासा झालेला आहे.ती माहिती कुणी दिली याबाबत माहिती नाही.

**स.स.श्री.मोरेश्वर सावे :** यापूर्वीही महापालिकेविषयी अनेक बातम्या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या आहेत.तेव्हा अशा प्रकारे वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या बातम्यांबाबत ताबडतोब खुलासा देणे आवश्यक आहे.

**मा.सभापती :** महापालिकेविषयी वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या बातम्यांबाबत जनसंपर्क अधिकारी यांनी ताबडतोब खुलासा देण्याची व्यवस्था करावी.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**स्थायी समिती सभापती पदासाठी निवडणूक,दि.३१ मे ८९ बुधवार दि.३१ मे,८९ रोजी स्थायी समिती सभापती पदासाठीची निवडणूक " नगरभुवन " (टाऊन हॉल ) येथे आयोजित करण्यात आली होती.**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३ "ब " अन्वये सभापती पदाची निवडणूक सभा मा.आयुक्त यांनी बोलावली होती.सदरील सभेस खालील अधिकारी तथा निम्ननिर्दिष्ट सन्मननीय सदस्य उपस्थित होते.

१) श्री. गाडे गंगाधर सुखदेव
२) //अलफखान हुसेनखान
३) // गील इकबालसिंग प्रितमसिंग
४) // घडामोडे मोतीराम नारायणराव
५) // जैस्वाल प्रदीप शिवनारायण
६) // नवपुते कचरु चंदभान
७) // पंडागळे रतनकुमार नारायणराव
८) // मगर शंकर जिजाराम
९) // मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
१०) // यादव अशोक सायन्ना
११) // स.अ.एकबालुद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
१२) // सावे मोरेश्वर दिनानाथ

सभेच्या सुरवातीस मा.आयुक्तांनी स्थायी समितीच्या सभापती पदासाठी निवडणूक होत असल्याचे सांगून या बाबतची सविस्तर माहिती सचिव देतील असे सांगीतले.महापालिका सचिवांनी स्थायी समिती सभापतींची मुदत संपल्याने आजच्या सभेसाठी १२ स्थायी समिती सदस्यांतून एका सदस्याची प्रभारी सभापती म्हणून निवड करुन त्यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभापतीची निवडणूक घेण्यात येईल.

यावेळी स.सभासद श्री.मोतीराम घडामोडे यांनी सभापती पदाच्या निवडणूकीचे अध्यक्षपद स.सदस्य श्री.मोरेश्वर सावे यांना देण्याची विनंती केली.त्यास स.सदस्य श्री.प्रदीप जैस्वाल यांनी अनुमोदन दिले.दुसरे स.सदस्य श्री.एकबालसिंग गील यांनी अध्यक्षपदासाठी स.सदस्य श्री.अलफखान यांचे नाव सुचविले.त्यास स.सदस्य श्री.यादव अशोक सायन्ना यांनी अनुमोदन दिले.अध्यक्षपदासाठी दोन नावे जाहीर केल्यानंतर स.सदस्य श्री.मोतीराम घडामोडे यांनी अशी विनंती केली की,दोघांच्या नावाच्या चिठ्ठ्या टाकण्यात याव्यात यावेळी मा.आयुक्त यांनी स्थायी समितीचे कामकाज नियम (ई) अन्वये,दोन पक्षातील सभासदांनी ज्याची अध्यक्षपदासाठी निवड करावयाची असेल त्यांनी हात वर करावे.ज्याच्या बाजूने हात वर केलेल्यांची संख्या जास्त होईल तो सभासद निवडून येईल असे सुचविले.त्याप्रमाणे दोन्ही बाजूने हात वर करुन ६

विरुध्द ५ अशी मते पडून श्री.अलफखान यांची बहुमताने आजच्या सभेचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आल्याचे मा.सचिव यांनी जाहीर केले.

मागील महापौरांची निवडणूक ही निपक्षपाती झालेली नाही.स.सदस्य श्री.अलफखान यांची अध्यक्षपदासाठी निवड ठरलेली आहे ते या कामकाजात निष्पक्षपातीपणे काम करणार नसल्याचा आक्षेप स.सदस्य श्री.मोतीराम घडामोडे यांनी केला.यावेळी स.सदस्य श्री.यादव अशोक सायन्ना यांनी हा आरोप चुकीचा आहे.ते पक्षपाती नाहीत त्यांची निवड बहुमताने झालेली असून ते सभा कामकाज व्यवस्थित व निष्पक्षपातीपणे पार पाडतील असे सांगितले.याच वेळी सभेच्या अध्यक्षस्थानी आरुढ झालेले श्री.अलफखान यांनी स.सदस्य श्री.मोतीराम घडामोडे यांना आपल्याला काय आक्षेप घ्यावयाचा आहे तो लेखी स्वरुपात देण्यात यावा असे सुचविले.

मा.अध्यक्षांनी " ज्या उमेदवारास आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना १० निनिटांचा अवधी देण्यात येतो. " असे सभागृहात सुचविले. मनपा सचिव यांनी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे वाचून दाखविली .ती येणेप्रमाणे

१) श्री.गाडे गंगाधर खुसदेव
२) // घडामोडे मोतीराम नारायणराव
३) // नवपुते कचरु चंद्रभान
४) // पंडागळे रतनकुमार नारायणराव

उक्त एकूण चार उमेदवारांपैकी श्री.कचरु नवपुते यांनी उमेदवारी मागे घेत असल्याचे जाहीर केले.आता केवळ तीनच उमेदवार सभापतीपदासाठी उत्सुक असल्याचे सांगून आजच्या सभेच्या कामकाजासाठी मतमोजणी अधिकारी व इतर कर्मचारी वर्ग असल्याचे सांगून आता रितसर मतदानास प्रारंभ होत असल्याचे सांगितले.वेळ ५.२०

## मतदान प्रक्रीया

मतदान प्रक्रीयेस प्रारंभ होण्यापूर्वी मतदान अधिकारी हयांनी मतपेटी उघडून सर्व सदस्यांना मतपेटी सर्वतोपरी रिक्त असल्याचे दाखवून दिले.तद्नंतर मतदान पेटी अध्यक्षांच्या परवानगीने मोहोरबंद करीत असल्याचे सचिव यांनी सुचविले.सर्व सन्माननीय सभासदांनी मतपत्रिकेवर फुली मारुन मत पेटीत मतपत्रिका कशी टाकावी याबाबत सभागृहात सविस्तर खुलासा केला.

स्थायी समितीला एकूण १२ सन्माननीय सदस्यांची नांवे वाचून दाखविण्यात येत आहेत.त्याप्रमाणे क्रमाक्रमाने येवून मतदानाचा अधिकार बजवावा असे सचिवांनी सुचविले.१) स.स.श्री.अलफखान,२) श्री.गाडे गंगाधर,३) श्री.गिल एकबालसिंग,४) श्री.घडामोडे मोतीराम,५) श्री.प्रदीप जैस्वाल,६) श्री.नवपुते कचरु,७) श्री.पंडागळे रतनकुमार,८) श्री.मगर शंकर,९) श्री. मिर्झा अन्वर बेग,१०) श्री.यादव अशोक सायन्ना,११) श्री.सय्यद अहमद एकबालुद्दीन,१२) श्री.सावे मोरेश्वर अशा प्रकारे सर्व सन्माननीय सभासदांनी क्रमाने मतदान पूर्ण केले.शेवटी सभेच्या प्रभारी अध्यक्षस्थानी असलेले स.स.श्री.अलफखान यांनी मतदान संपल्याचे घोषीत केले.वेळ ५.३०.

मतदान संपल्यानंतर नियमाप्रमाणे मतमोजणी सुरु करणेसाठी अध्यक्षांनी मोहोरबंद असलेली मतपेटी स्वत:कडे घेवून सभागृहासमोर मतपत्रिका काढून स्वाक्षऱ्यांकीत केल्यानंतर त्या छाननी अधिकाऱ्यांकडे हस्तांतर केल्या.त्यावेळेस स.स.श्री.गंगाधर गाडे यांचे प्रतिनिधी

म्हणून स.स.श्री.प्रदीप जैस्वाल उपस्थित होते.सर्व मतपत्रिका मोजून छाननी अधिकारी यांनी मतपत्रिका प्रभारी अध्यक्षांकडे सुपूर्द केल्या.

सभेचे प्रभारी अध्यक्ष स.स.श्री. अलफखान यांनी सभापती पदासाठी उभे असलेले उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.गंगाधर गाडे | यांना | ७ मते |
| २) | श्री.मोतीराम घडामोडे | यांना | ० मते |
| ३) | श्री.रतनकुमार पंडागळे | यांना | ५ मते |

पडली असल्याचे सभागृहात जाहीर करुन स.सभासद श्री.गाडे हयांना सर्वाधिक मते मिळाली असल्याने ते स्थायी समिती सभापती पदासाठी निर्वाचित झाल्याचे घोषीत केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका,औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका,औरंगाबाद.